# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 26/10/2019 (शनिवार)
# (सायंकाळ)

---

## सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा थाटुरवाडा येथे दिनांक 16/10/2019 चे 06.00 वा. दरम्यान सौ. आशा वासुदेव सुरजुसे, वय 40 वर्ष, रा. थाटुरवाडा या घरी बाथरूममध्ये तोंड धुन्याकरीता गेल्या असता त्यांना सापाने डाव्या हाताच्या मनगटाला चावा घेतला असता त्यांची प्रकृती खराब झाल्यानंतर त्यांना उपचारकामी मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले. उपचारादरम्यान 20/10/19 चे 06.00 वा. त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलीस नाईक श्री. राजेन्द्र मेश्राम पो.स्टे. काटोल यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार श्री. घोरमोडे हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

1) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौजा बोरी सदाचार (आमनदी) दिनांक 24/10/2019 चे 09:00 वा. ते दिनांक 25/10/2019 चे 13:00 वा. दरम्यान प्रभाकर मोरबाजी मरसकोल्हे (मृतक), वय 35 वर्ष, रा. बोरी सदाचार हा शेळ्या राखण्याकरीता गेला असता शेळ्या घरी परत आल्या. परंतु मृतक हा घरी परत आला नाही. फिर्यादी आणि नातेवाईकांनी मृतकाचा शोध घेतला असता दि 25/10/2019 रोजी बोरी सदाचार शिवारातील आम नदीचा पात्रात प्रभाकर मोरबाजी मरसकोल्हे हा मृत अवस्थेत मिळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेअर दिल अब्दुल मडावी, वय 52 वर्ष, रा. बोरी सदाचार यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा संजय पायक हे करीत आहेत.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 17 कि. मी. अंतरावर वडापुरा सावनेर झोपडपट्टी वार्ड क्र. 17, सावनेर येथे दिनांक 17/10/2019 चे 10:00 वा. दरम्यान सौ. साजिदा मुबारक शेख, वय 24 वर्ष, रा. झोपडपट्टी, सावनेर वडापुरा याने विषारी औषध प्राशन केले. प्रकृती खराब झाल्याने उपचाराकामी त्यांना प्रथम ग्रामीण रूगणालय सावनेर व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपूर भरती केले. उपचारा दरम्यान दि. 17/10/19 चे 12:30 वा सौ. साजिदा मुबारक शेख यांचा मृत्यू झाला. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे सफौ राजेन्द्र मेश्राम यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ राजेन्द्र यादव हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर